
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ५ मार्च २०२५

आतील पानावर
पान २– सुश्मिता करायचंय लग्न , पण...
पान ३ – इंडस्ट्री आता सेक्युलर राहिलेली नाही
पान ४ – समांथा लव्ह लाईफ खाजगी ठेवणार
पान ५ – ‘कीर्तन’ रुपेरी पडद्यावर इतिहास घडवणारं
पान ६ – सौरव गांगुलीचा बायोपिक येतोय



# ‘आशिकी ३’मधील कार्तिक आर्यनचा जबरदस्त लुक



‘आशिकी’ आणि ‘आशिकी २’ चित्रपटाच्या यशानंतर आता चाहते ‘आशिकी ३’ची आतुरतेने वाट पाहत आहेत. श्रद्धा कपूर आणि आदित्य रॉय यांच्या मुख्य भूमिकेतील ‘आशिकी २’ २०१३ मध्ये प्रदर्शित झाल होता. या चित्रपटातील गाण्याची आजही मोठी क्रेझ आहे. यातच आता ‘आशिकी ३’चा टीझर समोर आला आहे. ज्यात अभिनेता कार्तिक आर्यन त्याच्यासोबत ‘पुष्पा २’ फेम अभिनेत्री श्रीलीला दिसत आहे. कार्तिक आर्यनने सोशल मीडियावर या टीझरची पहिली झलक शेअर केली आहे. अनुराग बसू यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाचं नाव अद्याप जाहीर झालेलं नाही. परंतु टीझर पाहिल्यानंतर हा ‘आशिकी ३’ चा असल्याचं बोललं जातं आहे. या चित्रपटाचे शीर्षक अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. ‘आशिकी २’ मध्ये ज्याप्रमाणे आदित्य स्टेजवर गायकाची भूमिका साकारताना दिसला होता, त्याचप्रमाणे या टीझरमध्ये कार्तिक आर्यन दिसत आहे. लांब केस, लांब दाढी, हातात गिटार, कार्तिकचा हा हटके लूक फारच आकर्षक वाटत आहे. कार्तिक आर्यनने आपल्या आगामी चित्रपटाचा टीझर इन्स्टाग्राम हँडलवर रिलीज केला आहे. हा व्हिडिओ कार्तिक आर्यनच्या हृदय तुटलेल्या आशिकीपासून सुरू होतो. कार्तिक आर्यन मैफिलीत एक गाणे गाताना दिसत आहे. त्याच्या तोंडात एक सिगारेट आणि हातात गिटार आहे. दरम्यान, कार्तिक आर्यनबरोबर अनुराग बासूच्या चित्रपटात सुरुवातीला तृप्ती डिमरी होती. पण काही कारणास्तव तिला चित्रपटातून वगळण्यात आले. यानंतर आता या चित्रपटात श्रीलालाची एन्ट्री झाली आहे. यावर्षी दिवाळीच्या मुहूर्तावर हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# कुत्र्यांमुळे मोडला 'या' अभिनेत्याचा संसार

बॉलीवूडसाठी अफेअर, ब्रेकअप, लग्न आणि घटस्फोट या गोष्टी नवीन नाहीत. आतापर्यंत अनेक स्टार्सचे घटस्फोट झाले आहेत. सेलिब्रिटींचे घटस्फोट सहसा विवाहबाह्य संबंध किंवा, परस्पर मतभेदांमुळे होतात. पण एका बॉलीवूड अभिनेत्याच्या घटस्फोटाचं कारण अजबच आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण या अभिनेत्याचा घटस्फोट त्याच्या पाळीव कुत्र्यांमुळे झाला आहे. हा अभिनेता म्हणजे अरुणोदय सिंग होय. अरुणोदयने १३ डिसेंबर २०१६ रोजी मोठ्या थाटामाटात कॅनडाच्या ली एल्टनशी लग्नगाठ बांधली होती, पण अवघ्या तीन वर्षांत त्याचा संसार मोडला. घटस्फोटाचं कारण अरुणोदयचं प्राणीप्रेम ठरलं होतं. अरुणोदयला कुत्रे पाळण्याची खूप आवड आहे. लग्नानंतर ली एल्टनला कुत्र्यांच्या आवाजाचा त्रास होऊ लागला, त्यामुळे या जोडप्यात कुरबूर होऊ लागली. याच कारणावरून पती-पत्नीमध्ये खटके उडू लागले आणि अरुणोदय व ली एल्टन यांच्यातील तणाव वाढला. दोघांचा वाद इतका वाढला की त्यांनी घटस्फोटाचा निर्णय घेतला. त्यांनी कौटुंबीक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला. अरुणोदयचा घटस्फोट होऊन सहा वर्षे झाली आहेत, पण त्याने दुसरे लग्न केले नाही. आता अरुणोदय ४२ वर्षांचा आहे. तो सिंगल आहे आणि त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलणं टाळतो. अरुणोदय सिंगच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास २००९ मध्ये 'सिकंदर'मधून डेब्यू केल्यानंतर त्याने 'जिस्म २', 'मैं तेरा हीरो', 'मिस्टर एक्स, ब्लॅकमेल व मोहेनजोदडो या चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या; मात्र, त्याला बॉलीवूडमध्ये मोठा ब्रेक मिळाला नाही. त्याने ओटीटीवरही काम केलं आहे. 'अपहरण' या वेब सीरिजमधील कामासाठी अरुणोदय सिंगचं फार कौतुक झालं होतं. तो येत्या काळात 'श्रीमान' चित्रपटात दिसणार आहे.




# सुश्मिताला करायचंय लग्न, पण...

बॉलीवुड अभिनेत्री सुश्मिता सेन ४९ वर्षांची झाली आहे. आतापर्यंत सुश्मिताचे नाव अनेकांशी जोडले गेले. मात्र, अभिनेत्रीने लग्न केलेले नाही. त्यामुळे तिला वारंवार लग्न कधी करणार? या प्रश्नाला सामोरे जावे लागते. आता स्वतः सुश्मिताने लग्न कधी करणार याबाबतचा खुलासा केला आहे. एका चाहत्याच्या प्रश्नाला उत्तर देताना तिने लग्नाबाबत माहिती दिली. मिस यूनिव्हर्स असलेल्या सुश्मिताने लग्न आणि योग्य जोडीदार शोधण्याबाबत मत व्यक्त केले. तिने इंस्टाग्राम लाईव्ह सेशनचे आयोजन केले होते. यावेळी तिने चाहत्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली. बोलताना तिने तिच्या भविष्यातील प्लॅनिंगबद्दलही सांगितले. सुश्मिताने आतापर्यंत अनेकदा स्वतंत्रपणे जीवन जगण्याबद्दल स्पष्टपणे भाष्य केले. यावेळी तिने तिचा जोडीदार कसा असावा याबाबत मत मांडले. चाहत्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सुश्मिता म्हणाली की, 'मलाही लग्न करायचं आहे. पण, लग्नासाठी योग्य असे कोणीतरी मिळायलाही हवे ना. लग्न असेच तर होत नाही. असं म्हणतात की मनाचे नाते खूप रोमॅंटिक पद्धतीने जोडले जाते. ती व्यक्ती मनापर्यंत पोहचली की लग्न पण करेल.' सुश्मिताच्या या उत्तरामुळे तिचे चाहते देखील आनंदी झाले आहेत. अभिनेत्री कधी लग्न करणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, याआधी सुश्मिताचे अनेकांशी नाव जोडले गेले आहे. लव्ह लाइफमुळेही ती चर्चेत राहिली आहे. सुश्मिता सेन आणि अभिनेता रोहमन शॉल रिलेशनशिपमध्ये होते. तीन वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर २०२१ मध्ये त्यांचा ब्रेकअप झाला होता. त्यानंतर तिचे नाव ललित मोदीशीही जोडले गेले होते. मात्र, नंतर दोघांचेही नाते देखील संपुष्टात आल्याची चर्चा रंगली. तसेच, सुश्मिता अविवाहित असली तरीही ती दत्तक घेतलेल्या दोन मुलींचा सांभाळ करते.




# शिल्पा शिरोडकर बॉलिवूडमध्ये परतणार

अभिनेत्री शिल्पा शिरोडकर २५ वर्षांनी मोठ्या पडद्यावर परतणार आहे. सलमान खानचा वादग्रस्त शो बिग बॉस सीझन १८ मुळे चर्चेत राहिलेल्या शिल्पाने स्वत:च्या नव्या प्रवासाची घोषणा करत स्वत:च्या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर जारी केले आहे. शिल्पा शिरोडकर ही ९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री राहिली आहे. तिने सुनील शेट्टी, अनिल कपूर आणि मिथुन चक्रवर्ती यांच्यासह अनेक अभिनेत्यांसोबत काम केले आहे. आता ती एका बॉलिवूडच्या व्हिलनसोबत काम करणार आहे. शिल्पा शिरोडकरने अभिनयापासून ब्रेक घेतल्याच्या १३ वर्षांनी एक टीव्ही शोद्वारे पुनरागमन केले होते, परंतु चित्रपटांपासून ती दूर राहिली होती. परंतु आता ती चित्रपटांमध्ये दिसून येणार आहे. तिच्या आगामी चित्रपटाचे नाव जटाधारी असून याचे चित्रिकरण सुरू झाले आहे. मी स्वत:च्या नव्या प्रोजेक्टची घोषणा करताना उत्साहित आहे, याची कहाणी वेंकट कल्याण यांनी लिहिली आहे. दिग्दर्शन देखील त्यांनीच केले आहे. हा चित्रपट झी स्टुडिओच्या बॅनर खाली तयार केला जात असल्याची माहिती शिल्पाने दिली आहे. शिल्पा या चित्रपटात तेलगू अभिनेते सुधीर बाबू यांच्यासोबत दिसून येणार आहे. बागी ९ या हिंदी चित्रपटात त्यांनी खलनायकाची भूमिका साकारली होती. तर जटाधारी या चित्रपटात शिल्पा आणि सुधीर बाबू यांच्यासोबत शिविन नारंग हा अभिनेता दिसून येणार आहे. शिल्पाने नवदच्या दशकात अनेक चित्रपटांमध्ये काम केले. यात खुदा गवाह, गोपी किशन आणि बेवफा सनम यांचा समावेश आहे. शिल्पाचा अखे-



# इंडस्ट्री आता सेक्युलर राहिलेली नाही



जॉन अब्राहम गेल्या अनेक वर्षांपासून बॉलिवूडमध्ये काम करत आहे. त्याने 'टॅक्सी नंबर ९२११','दोस्ताना','फोर्स' असे अनेक हिट सिनेमे दिले आहेत. आता लवकरच तो आगामी 'द डिप्लोमॅट' सिनेमात दिसणार आहे. सिनेमाच्या प्रमोशननिमित्त जॉनने सध्याच्या सिनेमांबद्दल, इंडस्ट्रीबद्दल आपलं मत व्यक्त केलं आहे. इंडस्ट्रीमधले लोक आता तितके सेक्युलर राहिले नाहीत असं तो म्हणाला. तसंच त्याने विकी कौशलच्या 'छावा' सिनेमावरही प्रतिक्रिया दिली. जॉन अब्राहम म्हणाला, मला नाही वाटत आता आपण इतके सेक्युलर आहोत जितके आधी होतो. सेक्युलर असणं आणि ती भावना असणं खूप गरजेचं आहे. आता आपण गोष्टी विचारपूर्वक करत नाही. आता आपण प्रोपगंडा सिनेमे बनवत आहोत का? माहित नाही. आपण प्रभाव पाडणारे सिनेमे बनवत आहोत. जर कोणी म्हणालं की काश्मीर फाईल्स किंवा अजून कोणता असा सिनेमा प्रोपगंडा आहे...तर एका सामान्य व्यक्ती म्हणून मी म्हणेन की तो इफेक्टिव्ह सिनेमा आहे. तो पुढे म्हणाला, गोष्ट हिट होते. मी इथे सिनेमा प्रोपगंडा आहे की नाही याचं परीक्षण करणार नाही. मी सिनेमा बघणारा प्रेक्षक आहे. हा सिनेमा पाहून माझ्या भावना जागृत होत आहेत का? माझ्यावर याचा प्रभाव पडतोय का? तर याचं उत्तर आहे हो. मी याचं श्रेय दिग्दर्शकाला देईन. इतकी साधी ही गोष्ट आहे.

जॉनने छावा सिनेमाचं कौतुक केलं आहे. तो म्हणाला, मी विकीला मेसेजही केला होता. मी त्याच्यासाठी खूप खूश आहे. सिनेमा मस्त चालत आहे आणि प्रेक्षकांना थिएटरमध्ये खेचून आणण्यात यशस्वी ठरला आहे.




अभिनेता संजय दत्तने सोशल मीडियावर त्याच्या आगामी चित्रपटाची अपडेट दिली आहे. तो एका हॉरर-कॉमेडी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. महाशिवरात्रीनिमित्त या चित्रपटाचे नाव जाहीर करण्यात आले आहे. या चित्रपटाचे नाव 'भूतनी' आहे. याशिवाय

# संजय दत्तच्या 'भूतनी'चा टीझर रिलीज

या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला असून चित्रपटाची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. भूतनीमध्ये संजय दत्तसह मौनी रॉय, पलक तिवारी आणि सनी सिंग महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहेत. ही एक प्रेमकथा आहे. ज्यामध्ये मौनी रॉय भूताच्या भूमिकेत दिसणार आहे. टीझर पाहून, चित्रपटाविषयी उत्साह खूपच वाढला आहे. संजय दत्तने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत या चित्रपटाविषयी माहिती दिली आहे. व्हिडिओमध्ये संजय दत्त भूतनीसोबत भांडता दिसत आहे. चित्रपटाची घोषणा करत संजय दत्तने लिहिले की, 'या गुड फ्रायडेला घाबरण्यासाठी एक नवीन तारीख मिळाली आहे, FridêThe18th! यापूर्वी कधीही न पाहिलेल्या हॉरर, ॲक्शन आणि विनोदासाठी सज्ज व्हा. भूतनी १८ एप्रिलला चित्रपटगृहात धुमाकूळ घालणार. ' दरम्यान, टीजरमधील संजय दत्तचा लुक सर्वांच्या पसंतीस पडला आहे.

# विजय देवरकोंडाच्या सिनेमाचं नवं टायटल


दाक्षिणात्य अभिनेता, सुपरस्टार विजय देवरकोंडा सध्या त्याचा आगामी चित्रपट 'VD-12' मुळे चर्चेत आहे. त्याचा हा बहुचर्चित चित्रपट तमिळ, हिंदी आणि तेलुगू भाषेत प्रदर्शित केला जाणार आहे. नुकताच चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला आहे. याशिवाय चित्रपटाच्या नव्या टायटलवरून देखील पडदा हटविण्यात आलाय. 'किंगडम' असं या चित्रपटाचं नाव असणार आहे. येत्या मे महिन्यापर्यंत हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे. ॲक्शन सीन्सने परिपूर्ण असलेला या सिनेमाचा टीझर चाहत्यांचं लक्ष वेधून घेत आहे. सितारा एंटरटेन्मेंटच्या ऑफिशिल यूट्यूब चॅनेलवर हा टीझर रिलीज करण्यात आला आहे. 'किंगडम'च्या हिंदी टीझरसाठी बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरने आपला आवाज दिला आहे. सुरुवातीला या टीझरमध्ये लष्कराच्या गोळीबारात अनेक लोक मारले जातात, काही पळताना दिसत आहेत. तर अनेक मृतदेह सुद्धा दिसतायत. यानंतर विजयची सिनेमॅटिक एन्ट्री आहे, 'किंगडम'च्या १ मिनिट ५६ सेकंदाच्या टीझरमध्ये विजयचा पुनर्जन्म दाखवण्यात आला आहे. 'किंगडम'चे दिग्दर्शन गौतम टिन्नुरी यांनी केलं आहे. तसेच सितारा एंटरटेनमेंटची निर्मिती आहे. या चित्रपटाचे दोन भाग असणार आहेत. पण दोन्ही भागाचं कथानक पूर्णपणे वेगळं असणार आहे. दरम्यान, या चित्रपटाचं ८० टक्के शूट पूर्ण झालं आहे. या चित्रपटात विजय देवरकोंडासोबत अभिनेत्री भाग्यश्री बोरसे स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.



# ... तर मी 'रामायण' चित्रपटात कोणतेच पात्र साकारले नसते

सुपरस्टार यशला 'केजीएफ' चित्रपटामुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली. यश लवकरच 'टॉक्सिक' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याशिवाय, बहुचर्चित 'रामायण' चित्रपटातही तो महत्त्वाची भूमिका साकारणार आहे.

यशने 'रामायण' चित्रपटातील शूटिंगला देखील सुरुवात केली आहे. आता अभिनेत्याने त्याच्या भूमिकेबद्दल माहिती दिली आहे. नितेश तिवारी यांचा 'रामायण' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटात रणबीर कपूर 'प्रभू श्रीराम' आणि साई 'सीता' मातेच्या भूमिकेत दिसणार आहेत. तर चित्रपटात 'रावण'ची भूमिका यश साकारत आहे. एका मुलाखतीमध्ये बोलताना यशने रावणच्या भूमिकेबद्दल माहिती दिली. यापूर्वी असे कोणतेही पात्र साकारलेले नाही, त्यामुळे या भूमिकेसाठी खूप उत्साही असल्याचे तो म्हणाला. मुलाखतीमध्ये बोलताना यश पुढे म्हणाला की, 'माझ्यासाठी रावणची भूमिका खूप खास आहे. मी ही भूमिका कोणत्याही दुसऱ्या कारणासाठी स्वीकारलेली नाही. जर कोणी मला विचारले असते की रामायणमध्ये रावणशिवाय कोणतीही दुसरी भूमिका करशील का, तर मी नकार दिला असता. मला या पात्रातील वेगवेगळे पैलू आवडतात. रावणची भूमिका वेगवेगळ्या प्रकारे साकारता येऊ शकते.' नितेश तिवारी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट रामायणचे शूटिंग गेल्या वर्षीच सुरू झाले आहे. रणबीर आणि साई पल्लवी यांनी त्यांचे शूटिंग आधीच पूर्ण केले आहे. सध्या यश रावणच्या भूमिकेतील शूटिंग करत आहे. चित्रपटात सनी देओल देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. दरम्यान, यश लवकरच 'टॉक्सिक' या चित्रपटासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट १० एप्रिल २०२५ ला मोठ्या पडद्यावर रिलीज होईल.





# प्रभू देवाच्या लेकाने डान्समध्ये वडिलांना दिली टक्कर

तेलुगू फिल्म इंडस्ट्रीमध्ये 'बाप बेटा' जोडीचा ट्रेंड आता रुजू झाला आहे. यात आणखीन एका जोडीची भर पडलीय. मुळात ही जोडी आहे प्रभु देवा आणि त्याचा लेक ऋषी राघवेन्द्र यांची. आपल्या दमदार नृत्यशैलीमुळे प्रभुदेवाने लोकप्रियता मिळवली आहे. तर मुलगा ऋषीदेखील वडिलांप्रमाणेच डान्समध्ये महारथ मिळवली आहे. ऋषी राघवेन्द्रला लहानपणासूनच नृत्याचे वेड लागले. आता तो हुबेहुब प्रभुदेवासारखा डान्स करतो. नुकतंच एका कार्यक्रमात प्रभु देवा आणि ऋषी राघवेन्द्र यांनी एकत्र डान्स केलाय. कार्यक्रमात बाप-लेकाच्या डान्सनं धुराळा उडवून दिला. प्रभु देवानं त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर केला आहे. कॅप्शनमध्ये त्यानं लिहलं, मला माझा मुलगा ऋषी राघवेन्द्रची तुमच्याशी ओळख करुन देताना अभिमान आहे. आम्ही दोघांनी पहिल्यांदाच एकत्र स्पॉटलाइट घेतली. हे डान्सपेक्षा खूप जास्त आहे. हा एक वारसा, एक आवड आणि एक प्रवास आहे जो नुकताच सुरू झालाय. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केलाय. एकानं लिहलं, जसा बाप, तसा मुलगा. तर आणखी एकाने लिहलं, प्रभूदेवा कायम विनम्र आणि जमिनीशी जोडलेल्या लोकांपैकी एक आहे. तर काही नेटकऱ्यांनी हार्ड एमोजी शेअर करत प्रभूदेवाच्या लेकाला शुभेच्छा दिल्या आहेत. नृत्यदिग्दर्शक असण्यासोबतच एक उत्तम अभिनेता सुद्धा आहे. प्रभूदेवाने एकामागून एक अनेक चित्रपटात काम केले केले. यासोबतचं दिग्दर्शन क्षेत्रात देखील काम केलं आहे. प्रभू देवानं अनेक हिट गाण्यांची कोरियोग्राफी केली आहे आणि त्याला त्यासाठी दोन नॅशनल अवॉर्ड देखील मिळाले आहे.

# समांथा लव्ह लाईफ खाजगी ठेवणार

साउथची प्रसिद्ध अभिनेत्री समांथा रुथ प्रभू काही दिवसांपासून मायोसिटिस नावाच्या आजाराने त्रस्त होती, त्यामुळे ती एक वर्षापासून सिनेइंडस्ट्रीपासून दूर होती. शेवटची ती प्राइम व्हिडिओच्या 'सिटाडेल: हनी बनी' या सीरिजमध्ये पाहायला मिळाली. या सीरिजचे दिग्दर्शन राज डीकेने केले आहे. दरम्यान, या अभिनेत्रीने चित्रपटात पुनरागमन करतानाचा तिचा अनुभव शेअर केला आहे. तसेच तिने तिच्या पहिल्या प्रेमाबद्दलही खुलासा केला आहे. समांथाने नुकतेच तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल सांगितले. तिने सांगितले की ती लवकरच 'बंगाराम' चित्रपटातून निर्माती म्हणून पदार्पण करणार आहे. याशिवाय ती तिची मोस्ट अवेटेड वेब सीरिज 'रक्त ब्रह्मांड'चीदेखील निर्मिती करणार आहे. ही सीरिज अजून निर्मितीच्या टप्प्यात सुरू आहे. समांथा रुथ प्रभूनेही या मुलाखतीत तिच्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितले आहे. ती म्हणाली की, 'रक्त ब्रह्मांड मला लवकरच संपवायचे आहे आणि पुढील महिन्यात प्रदर्शित होणाऱ्या इतर चित्रपटांचे काम पूर्ण करायचे आहे. एक-दोन महिन्यांत बरेच काम पूर्ण करायचे आहे.' ती पुढे म्हणाली की, 'मला वाटते की माझे चित्रपटांपासूनचे अंतर आता संपले आहे. हे माझे पहिले प्रेम आहे. समांथा रुथ प्रभूने मुलाखतीत तिच्या लव्ह लाईफबद्दल सांगितले. ती म्हणाली की, 'समांथा सिंगल आहे. मला वाटत नाही की मी माझ्या लव्ह लाईफबद्दल पुन्हा कोणाशीही बोलेन. हा माझ्या आयुष्याचा एक भाग आहे, तो खूप खाजगी ठेवण्याचा मी विचार केला आहे. मी त्यावर पुन्हा बोलणार नाही.




# 'कीर्तन' रुपेरी पडद्यावर इतिहास घडवणार



ग्लॅमरस आणि मनोरंजनप्रधान विषयांपासून वेगळ्या वाटेवरचा एक अनोखा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले दिग्दर्शक अतुल जगदाळे यांच्या 'कीर्तन' या आगामी चित्रपटाविषयी सध्या चित्रपटसृष्टीत विशेष चर्चा सुरु असल्याचे ऐकिवात येत आहे. महाराष्ट्राच्या संत परंपरेवर आधारित हा भव्यदिव्य चित्रपट प्रेक्षकांना वेगळ्या विश्वात घेऊन जाईल असे जाणकार सांगत आहेत.

या चित्रपटाची निर्मिती 'अतुल जगदाळे प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या बॅनरखाली होत असून, तो आतापासूनच उत्कंठतेचा विषय ठरला आहे. 'कीर्तन' हा चित्रपट केवळ संतपरंपरेवर आधारित धार्मिक चित्रपट नसून, त्याला एक भव्य दृष्टीकोन देण्यात आला आहे. कीर्तनकारांच्या जीवनावर प्रकाश टाकत, त्यामधील संघर्ष आणि समाजप्रबोधनाचे महत्त्व उलगडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून होणार आहे. भव्य सेट्स, अप्रतिम छायांकन आणि दमदार कथा यामुळे हा चित्रपट केवळ इतिहास नव्हे, तर समकालीन रसिकांसाठीही एक मंत्रमुग्ध करणारा अनुभव असणार आहे. 'कीर्तन' म्हटलं कि ओघाने संगीत- लोकसंगीत आलंच. त्यामळे चित्रपटसृष्टीत सध्या सर्वाधिक चर्चेत असलेला प्रश्न म्हणजे 'कीर्तन' चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाची धुरा कोणाच्या हाती असणार? या विषयाला अत्यंत प्रभावी आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या सुरांची नस जाणणाऱ्या प्रतिभावंत संगीतकारांपैकी नेमकी कोणाकडे ही धुरा सुपूर्द होणार? कीर्तनात कोणत्या गायकांचा स्वर तल्लीन करणार? या चर्चांना उधाण आले आहे. तसेच या भव्य चित्रपटात कोणकोणत्या दिग्गज कलावंतांची वर्णी लागणार आहे याविषयीसुद्धा कमालीचे औत्सुक्य आहे. निर्माते-दिग्दर्शक अतुल जगदाळे यांनी यासंदर्भात गुप्तता राखली असली, तरी 'लवकरच मोठी घोषणा होईल' असे त्यांनी संकेत दिले आहेत. त्यामुळे चित्रपटप्रेमींच्या उत्कंठेला आणखी उधाण आले आहे. 'गणवेश' या सामाजिक आशयाच्या चित्रपटानंतर तीन- चार वर्षांपासून अतुल जगदाळे यांनी एका भव्य दिव्य हिंदी चित्रपटावर काम सुरु केले आहे. त्यासोबत त्यांनी आपल्या मातृभाषेतील कलाकृतीलाही विशेष प्राधान्य देत मराठी माणसाला प्रिय असलेले 'कीर्तन' भव्य रुपेरी पडद्यावर सादर करण्याचा प्रयोग करत आहेत. अतुल जगदाळे यांना कलावंत तंत्रज्ञ निवडीची अचूक जाण आहे. त्यांच्या 'गणवेश' मध्ये दिलीप प्रभावळकर, मुक्ता बर्वे, किशोर कदम, स्मिता तांबे यांसारख्या दिग्गज कलाकारांनी भूमिका साकारल्या होत्या. त्यामुळे 'कीर्तन' मध्ये कोणती स्टारकास्ट असणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# प्रेक्षक मला मारायला निघालेत



लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' सिनेमात अभिनेता विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. या सिनेमाला बॉक्स ऑफिसवर तुफान प्रतिसाद मिळत आहे. विकीसह या सिनेमात अनेक मराठी कलाकार झळकले आहेत.

संतोष जुवेकर, आशिष पाथोडे, शुभंकर एकबोटे असे सगळेच कलाकार चित्रपटात शेवटच्या सीनपर्यंत लक्ष वेधून घेतात. 'छावा'मध्ये सारंग साठ्ये आणि सुव्रत जोशी यांनी अनुक्रमे गणोजी आणि कान्होजी या भूमिका साकारल्या आहेत. सारंग पहिल्यांदाच नकारात्मक भूमिकेत झळकला असल्याचं त्याने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं.

चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या सैन्याकडून कैद केलं जातं असा अंगावर शहारा आणणारा सीन आहे. यावेळी आंबाघाटाचा कठीण मार्ग मुघलांना कसा सापडला ही शंका संताजीच्या मनात निर्माण होते आणि यातूनच पुढे फितुरी झाल्याचं उघड होतं. याच भूमिका सारंग आणि सुव्रत यांनी साकारल्या आहेत. गणोजींच्या भूमिकाला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळाला असा प्रश्न सारंग साठ्येला मुलाखतीत विचारण्यात आला. यावर अभिनेता म्हणाला, गणोजींची भूमिका पाहून मला मारायला निघालेत प्रेक्षक त्यामुळे मी प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांबद्दल काही बोलणार नाही. त्यांचं सुद्धा बरोबरच आहे कारण, ती साधी गोष्ट नाहीये.

स्वराज्याला तडा जाईल अशी गोष्ट त्या पात्राने केली होती. त्यामुळे अर्थातच त्यांचा रोष स्वीकारायला मी तयार आहे. पण, याचबरोबर मी एक गोष्ट सांगतो की, लक्ष्मण सरांनी आम्हाला कास्ट यासाठी केलं होतं कारण, त्यांचं असं म्हणणं होतं दोन असे कलाकार ज्यांनी याआधी फार गोड कामं केली आहेत, त्यांनी याआधी कधीही निगेटिव्ह भूमिका केलेली नाही, अशा दोन कलाकारांनी जर ही भूमिका केली तर, लोक कदाचित अंदाज बांधू शकणार नाहीत की, हे दोघं पुढे जाऊन असं काहीतरी करतील. मग, ते लोकांच्या पण आणखी जिव्हारी लागेल. त्यामुळेच आमचं कास्टिंग झालं होतं.

आमच्या मनात खूप खूप धकधक होती पण, लक्ष्मण सरांना माहिती होतं हे वर्क होईल त्यामुळे यामागचं सगळं क्रेडिट त्यांचं आहे. असं सारंग साठ्येने सांगितलं. दरम्यान, 'छावा' सिनेमाने भारतात रेकॉर्डब्रेक कमाई करत इतिहास रचला आहे.

# वैभव तत्ववादी तेलुगू सिनेमात झळकणार



मराठमोळा अभिनेता वैभव तत्ववादी हा मराठी सिनेसृष्टीतील नावाजलेला अभिनेता आहे. 'कॉफी आणि बरंच काही','मिस्टर अँड मिसेस सदाचारी', 'व्हॉट्स अप लग्न' तसेच 'भेटली तू पुन्हा' अशा एकापेक्षा एक गाजलेल्या चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. मराठीबरोबरच हिंदी सृष्टीतही त्याने स्वतःची एक वेगळी आ-ळख निर्माण केली आहे. आता लवकरच तो तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे. नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत अभिनेत्याने त्याच्या आगामी प्रोजेक्टबद्दल माहिती दिली आहे. अभिनेता वैभव तत्ववादी हा सोशल मीडियावर कमालीचा सक्रिय आहे. त्याचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. याद्वारे तो चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतो. नुकतीच अभिनेत्याने इन्स्टाग्रामवर हैदराबादमधील अन्नपूर्णा स्टुडिओमधील सेटवरील फोटो चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. पहिलं नेहमीच खास असतं. माझी पहिली तेलुगू फिल्म..., नवीन भाषा, नवीन स्टोरी..., असं कॅप्शन देत अभिनेत्याने ही पोस्ट शेअर केली आहे. त्यामुळे अभिनेत्याचे चाहते प्रचंड खुश असल्याचं पाहाला मिळतंय. मराठीसह हिंदी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाची चुणूक दाखवल्यानंतर वैभव तेलुगू चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. दरम्यान, वैभव तत्ववादीची महत्त्वाची भूमिका असणारा पहिला तेलुगू चित्रपट आहे. परंतु या चित्रपटाचं नाव, त्यामधील त्याची भूमिका याबद्दल त्याने कोणतीही माहिती दिलेली नाही. ही माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे.




# पुढच्या जन्मी हा नवरा नको

अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा लग्नानंतर तब्बल ३७ वर्षांनी घटस्फोट घेणार असल्याच्या चर्चा होत आहेत. एका मराठी अभिनेत्रीशी गोविंदाची जवळीक या घटस्फोटाला कारणीभूत असल्याचं म्हटलं जात आहे. गोविंदाच्या घटस्फोटांच्या चर्चांदरम्यान त्याच्या पत्नीने काही दिवसांपूर्वी दिलेल्या मुलाखतीची चर्चा होऊ लागली आहे. पुढच्या जन्मी हा नवरा नको, तसेच गोविंदा खूप मागास विचारांचा होता, असं सुनीता आहुजा म्हणाली होती. लोक तुमच्या पाठीमागे काय करतात हे तुम्हाला कधीच कळत नाही. पुरुषांवर कधीही विश्वास ठेवू नका. ते सारखे बदलत असतात. आमच्या लग्नाला ३७ वर्षे झाली आहेत. आधी तरी तो कुणाबरोबर गेला नाही, आताचं मी सांगू शकत नाही, असं सुनीता एका मुलाखतीत म्हणाली होती. सुनीताने याच मुलाखतीत ती व गोविंदा वेगळे राहतात, असा खुलासा केला होता. आमची दोन घरं आहेत. फ्लॅटमध्ये माझे मंदिर आणि माझी मुलं आहेत. आम्ही फ्लॅटमध्ये राहतो आणि त्याला लोकांना भेटण्यात उशीर होतो. त्याला बोलायला आवडतं, त्यामुळे तो दहा लोकांना गोळा करून त्यांच्याशी गप्पा मारत बसतो. मी, माझा मुलगा आणि माझी मुलगी फ्लॅटमध्ये एकत्र राहतो, पण आम्ही फार कमी बोलतो कारण मला वाटतं की तुम्ही जास्त बोलून तुमची ऊर्जा वाया घालवता, असं सुनीता म्हणाली होती. मी त्याला सांगितलंय की मला पुढच्या जन्मात तो नवरा म्हणून नकोय. तो फिरायला जात नाही. मला पतीबरोबर बाहेर जाऊन रस्त्यावर पाणीपुरी खायची इच्छा आहे. पण त्याने कामात खूप वेळ घालवला. आम्ही दोघे एकत्र चित्रपट पाहायला बाहेर गेल्याचं मला आठवतच नाही, अशी खंत सुनीताने व्यक्त केली होती. मी आमच्या लग्नात पूर्वी खूप सुरक्षित होते, आता नाही, असं ती हसत म्हणाली होती. आधी मला काहीच फरक पडत नव्हता. पण आता त्याचे वय ६० पेक्षा जास्त झाले आहे, त्यामुळे मला भीती वाटते. जेव्हा तो तरुण होता तेव्हा तो इतका काम करायचा की त्याच्याकडे अफेअर्ससाठी वेळ नव्हता पण आता मला भीती वाटतं की रिकामा वेळ आहे तर काही करायला नको, असं सुनीता म्हणाली होती. घटस्फोटाची बातमी आल्यानंतर या मुलाखतीत सुनीताने तिच्या मनातील खदखद व्यक्त केल्याचं बोललं जात आहे.

# श्रीलीला करणार कार्तिकसोबत रोमान्स

प्यार का पंचनामा' या चित्रपटातून बॉलिवूड इंडस्ट्रीत पदार्पण करत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणार अभिनेता म्हणजे कार्तिक आर्यन. कार्तिकने सोनू के टिटू की स्वीटी', 'लुका छुपी', 'भूल भुलैय्या-२', 'भूल भुलैय्या-३' अशा उत्तमोत्तम चित्रपटांत काम करत स्वत:च्या अभिनयाची छाप सोडली आहे. आता लवकरच अभिनेता एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांच्या मनात चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. टीझरमध्ये कार्तिकसोबत दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला दिसत आहेत. परंतु निर्मात्यांकडून त्याच्या या आगामी चित्रपटाचं नाव रिव्हील करण्यात आलेलं नाही. दरम्यान, या चित्रपटात कार्तिकचा कधीही न पाहिलेला अंदाज पाहायला मिळणार आहे. टी-सीरिजने सोशल मीडियावर शेअर केलेल्या या टीझरमध्ये वाढलेले केस आणि दाढी अशा लूकमध्ये कार्तिक आर्यन दिसतो आहे. या चित्रपटात त्याने एका रॉकस्टारची भूमिका साकारल्याचे टीझर पाहून लक्षात येतंय. त्याचबरोबर टीझरमध्ये कार्तिक स्टेजवर 'आशिकी' चित्रपटामधील 'तू ही मेरी जिंदगी' हे गाणं गाताना दिसतोय. त्यावरून हा सिनेमा 'आशिकी' फ्रँचाईजीचा तिसरा भाग असू शकतो असे अनेक तर्कवितर्क चाहते लावत आहेत. परंतु या चित्रपटाचं नाव अद्यापही गुलदस्त्यात आहे. श्रीलीला या चित्रपटातून तिचा बॉलिवूडमध्ये डेब्यू करत आहे. दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अभिनेत्री श्रीलीला एक उत्कृष्ट डान्सर आहे. 'पुष्पा २' मधील आयटम साँगमुळे ती प्रसिद्धीझोतात आहे. परंतु यापूर्वी श्रीलीलाने 'गुंटूर करम' चित्रपटातील 'कुरिची मदाथापेटी' गाण्यात महेश बाबूबरोबर धमाकेदार डान्समुळे तिची सर्वत्र चर्चा झाली होती. कार्तिक आर्यन आणि दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला स्टारर हा सिनेमा दिवाळीच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक अनुराग बसू याचे दिग्दर्शन करत आहेत. याशिवाय चित्रपटाला संगीत प्रीतम यांनी दिलं आहे.



# सौरव गांगुलीचा बायोपिक येतोय



भारताचा माजी क्रिकेटपटू, माजी कर्णधार आणि ज्याला प्रिन्स ऑफ कोलकाता म्हटले जाते, अशा सौरव गांगुलीचाही आता बायोपिक येत आहे. याबद्दल खुद्द सौरव गांगुलीने दुजोरा दिला आहे. याआधी अनेक क्रिकेटपटूंचे बायोपिक आलेले आहेत. दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतने महेंद्रसिंह धोनीच्या बायोपिकमध्ये काम केले होते. हा चित्रपट चांगलाच लोकप्रिय झाला. पश्चिम बंगालमधील बर्धमान शहरात सौरवने माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्याने बायोपिक येत असल्याबाबत माहिती दिली. तसेच या चित्रपटात बॉलिवूडचा अभिनेता राजकुमार राव हा त्याची भूमिका वठविणार असल्याचे सांगितले. पण तारखांचा घोळ असल्यामुळे बायोपिक प्रदर्शित करण्यात वर्षभराहून अधिक काळ लागू शकतो, असेही गांगुलीने सांगितले. सौरव गांगुलीने भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने चांगले यश मिळवले होते. बायोपिकमध्ये गांगुलीचे वैयक्तिक आयुष्य आणि मैदानातील त्याचे नेतृत्व याबाबत चित्रण असण्याची शक्यता आहे. तर राजकुमार हा बॉलिवूडमधील प्रयोगशील अभिनेता मानला जातो. त्यामुळे तो सौरव कसा साकारतो, याबद्दल चाहत्यांना उत्सुकता असेल. दरम्यान, बायोपिकवरील काम प्राथमिक स्तरावर असल्याची माहिती आहे. चित्रपटाबाबतची अधिकची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान राजकुमार राव त्याच्या आगामी भूल चुक माफ चित्रपटाच्या प्रदर्शनाची तयारी करत आहे. त्याच्याबरोबर वामिका गब्बी या चित्रटात दिसणार आहे. याशिवाय राजकुमारचा मलिक हा चित्रपट अखेरच्या टप्प्यात असून २० जून २०२५ रोजी तो प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. सौरव गांगुलीने भारतासाठी ११३ कसोटी आणि ३११ एकदिवसीय सामने खेळले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व फॉरमॅटमध्ये एकूण १८,५७५ धावा केल्या आहेत. क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्याने क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल आणि बीसीसीआयचे अध्यक्षपद भुषविलेले आहे.



**भारतीय चित्रपट संगीताचा इतिहास हा एका परीने आधुनिक भारताचा कला इतिहास आहे. विशेषत: हिंदी फिल्म संगीताचा उद्गम व विकास यांचे अवलोकन करत असताना भारतीय समाजाच्या बदलत्या मनोवृत्ती व बदलत्या सामाजिक संदर्भाचे स्पष्ट प्रतिबिंब हिंदी चित्रपट संगीतात उमटलेले आढळून येते. पारशी नाटकांमधून सुरुवातीचे हिंदी चित्रपट उत्क्रांत झाले होते.**



## आदमी मुसाफिर हैं..

# रांगडा शिपाई, लोकप्रिय गीतकार आनंद बक्षी

हिंदी बोलपटातील (१९३१ ते १९४०) गीते ही बहुतांश संगीतबद्ध केलेले गद्य असत. हिंदी चित्रपट गीतांमध्ये दर्जेदार गीतरचना आणण्याचे श्रेय न्यू थिएटर्स, कोलकात्याच्या द्विभाषी चित्रपटांना जाते. १९४० च्या दशकात द्वितीय महायुद्धाच्या काळात अनेक क्षेत्रातील व्यावसायिक चित्रपट क्षेत्रात दाखल झाले. थोडक्या काळात वारेमाप पैसा कमवण्याच्या एकमात्र हेतूने प्रेरित होती. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील मातब्बर मंडळींना एकत्र आणून चित्रपट निर्मिती करण्याचा घाट घातला. जुनी स्टुडिओ पद्धती व त्यातील पगारी कलावंत ही पद्धत आपसूक मोडीत निघाली. बिनीच्या कलावंतांना अपेक्षाही केले नसेल असे मानधन प्राप्त होऊ लागले. याचा एक दृश्य परिणाम असा झाला की, स्तरीय गीतकार व संगीतकार यांचा हिंदी चित्रपट संगीतात प्रवेश झाला. मजरूह सुल्तानपुरी, शकील बदायुनी, प्यारेलाल संतोषी व भारताच्या फाळणीनंतर राजेंद्र कृष्ण, साहीर लुनियानवी, शैलेंद्र, हरसत जयपुरी यांच्यासारखे सिद्धहस्त गीतकार हिंदी चित्रपटसृष्टीस लाभले.

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात चित्रपट गीतांमध्ये दोन पृथक प्रवाह दृक्गोचर झाले. एक प्रवाह म्हणजे मुळात कवी असलेले व नंतर गीतकार म्हणून स्थापित झालेले साहीर, शैलेंद्र, मजरूह, शकील बदायुनी यांचा एक प्रवाह तर अंगभूत कलेने चित्रपटात प्रसंगोचीत चपखल गीत रचना करणारे राजेंद्र कृष्ण, हसरत जयपुरी हे गीतकार!

चित्रपटांमध्ये गीत-संगीत हे मुळात कथानकाचा ओघ कायम राखून कथा वस्तूचे तपशील व वैशिष्ट्ये प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचा सुलभ मार्ग म्हणून मान्यता पावले आहे. चित्रपट गीते ही मुद्दलात प्रसंगानुकूल बेतलेली असतात तर मौलिक कविता या कवीच्या भाव-भावना व मनोवृत्तीचा उत्कट आविष्कार असतात तसेच चित्रपट गीते ही संगीतबद्ध करायची असल्यामुळे गीताची चाल व वाद्यमेळ यामध्ये शब्द पेरण्याची हातोटी असलेले गीतकारच या क्षेत्रात टिकू शकतात. मुख्य म्हणजे, आपला भाव पात्रांद्वारे अचूक पोहोचविण्याची कला गीतकारांमध्ये असावीच लागते. १९३० साली रावळपिंडी, पंजाब (आता पाकिस्तानात) घरंदाज ब्राह्मण वैद्य कुटुंबात जन्मलेले आनंद बक्षी हे भारतातील आतापर्यंतच्या यशस्वी गीतकारांपैकी एक होत. दर्जा, सातत्य व प्रभाव या बिंदूंवर आनंद बक्षी हे लक्षणीय गीतकार म्हणूनच हिंदी चित्रपट संगीतात ओळखल्या जातात व जातील. पंजाब प्रांताच्या समृद्ध लोककला व लोककथा यांचा कळत-नकळत प्रभाव आनंद बक्षी यांच्यावर बालपणापासूनच पडला. वातावरणात भरून असलेल्या उर्दू शायरीकडे आकृष्ट झालेल्या आनंद बक्षी यांना मुशायरे व रंगमंच यांचे अनिवार वेड होते.

१९४७ साली भारताच्या फाळणीमुळे प्रथम पुणे, नंतर मीरत व अंतिमत: दिल्ली येथे त्यांच्या परिवारास आश्रय घ्यावा लागला. गरज म्हणून कोवळ्या वयातच त्यांना भारतीय नौदलात नोकरी पत्करावी लागली. पण गीतरचनेची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. १९५६ साली त्यांनी मुंबईस हिंदी चित्रपटसृष्टीत नशीब आजमावण्यासाठी प्रयाण केले. 'भला आदमी' (१९५८) चित्रपटासाठी त्यांना गीतलेखनाची संधी मिळाली. आनंद बक्षींना त्यांच्या गीतलेखनाचा खरा सूर सापडला तो १९६० च्या दशकात. 'मेहंदी लगे मेरे हाथ' (१९६२) या कल्याणजी-आनंदजी यांनी संगीतबद्ध केलेल्या चित्रपटांमुळे सर्वसामान्य प्रेक्षकांना त्यांचे नाव परिचित झाले. पण, त्यांना खरी लोकमान्यता मिळवून देणारे गीत होते ते 'फूल बने अंगारे' चित्रपटातील 'चांद आहे भरेगा फूल दिल थाम लेंगे' हे गीत! तद्नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. १९६० च्या दशकात नव्या संगीतकारांनी नवीन संगीत प्रवाह व संगीत संकल्पना आणल्या. चित्रपट कथा कल्पना व प्रस्तुती यामध्येदेखील लक्षणीय बदल घडून आले होते. या बदलत्या परिवेशात आनंद बक्षी चपखल बसले. 'हिमालय की गोद में' व 'जब जब फूल खिले' या अती यशस्वी संगीतमय चित्रपटांनी त्यांची नाममुद्रा जनमानसावर ठसवली. याच दरम्यान आलेल्या 'दुल्हा दुल्हन' व 'वल्हाह क्या बात है' या चित्रपटांनी सर्वसामान्यांच्या भावना त्यांना रुचेल, पटेल व आवडेल अशारीतीने दैनंदिन जीवनातील उपमा वापरून गीते लिहिणारा एक दर्जेदार गीतकार हिंदी चित्रपटांना मिळाला, यावर शिक्कामोर्तब झाले. पण, आनंद बक्षी यांची खरी गुणप्रभा बहरली ती लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासमवेत! 'मिस्टर-इन बॉम्बे' (मेरे मेहबूब कयामत होगी), 'लुटेरा' (किसी को पता न चले बात का), 'आसरा' (नींद कभी रहती थी आँखो मे) ह्या गीतांनी लोकप्रियता मिळवली. 'आये दिन बहार के' या 'अ' दर्जाच्या चित्रपटातील गीतांच्या यशाने आनंद बक्षी हे आघाडीचे गीतकार म्हणून सुस्थापित झाले. त्यावर कळस चढला तो 'मिलन' (१९६७) व 'फर्ज' (१९६७) या चित्रपटांच्या अती-यशस्वी गीत-संगीताने! आनंद बक्षी यांना कालजयी लोकप्रियता मिळवून देणारा चित्रपट होता 'आराधना' (१९६९). या चित्रपटातील गीत-संगीताने हिंदी चित्रपट संगीताचा चेहरा-मोहरा आमूलाग्र बदलून टाकला.

१९७० चे दशक खर्‍या अर्थाने आनंद बक्षी यांचे दशक होते. या दशकातील बहुतांश यशस्वी चित्रपटांमध्ये त्यांची गीतरचना प्राधान्याने होती. १९८० च्या दशकात मात्र ते मंदावले. १९८० च्या दशकात उदीतमान झालेल्या स्टार-पुत्रांच्या पदार्पणाच्या चित्रपटातील 'लव्ह स्टोरी' (कुमार गौरव), 'रॉकी' (संजय दत्त), 'बेताब' (सनी देवल) व हिरो (जॅकी श्रॉफ) या चित्रपटातील गीतरचना करण्याचे श्रेय म्हणजे त्यांच्या विजिगीषु वृत्तीला दिलेली मानवंदना! १९९० च्या दशकात 'हम', 'सौदागर', 'खुदा गवाह', 'लम्हे', 'डर', 'खलनायक' अशा चित्रपटांसाठी त्यांनी गीतरचना केली व ती गीते रसिकांच्या पसंतीसही उतरली. त्यांची खरी कमाल होती ती 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' (१९९५) व 'दिल तो पागल है' (१९९७) या चित्रपटातील गीते! त्यानंतर मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी अर्धनिवृत्ती पत्करली. २००० च्या दशकातील 'मोहब्बते', 'यादे', 'गदर' हे त्यांचे उल्लेखनीय चित्रपट! गद्यात्मक पद्य लिहिण्यात ते वाकबगार होते (बैठ जा बैठ गयी, टेसन से गाडी जब छूट जाती है तो एक, दो, तीन हो जाती है) आयुष्याच्या अंतापर्यंत ते गीतरचना करतच होते. अख्खड पंजाबी स्वभाव व शीघ्रकोपी असल्यामुळे त्यांना चित्रपटसृष्टीत फारसे मित्र नव्हते. आयुष्य तब्येतीत जगून आनंद बक्षी यांनी तुमच्या आमच्या जीवनात आनंदाची पखरण केली, हे मात्र खरे. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**देवेंद्र प्रभुणे**

# 'छावा' आता टॉलीवूड गाजवणार!




लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' सिनेमाने सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा या चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर मांडण्यात आली आहे. २०२१ मध्येच त्यांनी विकी कौशलचं महाराजांच्या भूमिकेसाठी कास्टिंग केलं होतं. या सगळ्या मेहनतीची पोचपावती दिग्दर्शकांना सिनेमा प्रदर्शित झाल्यावर मिळालेली आहे. 'छावा' सिनेमा केवळ महाराष्ट्रातीलच नाहीतर देशभरातील सिनेप्रेमींच्या पसंतीस उतरला आहे. सिनेमाचा क्लायमॅक्स पाहून प्रेक्षक भावुक झाल्याचे अनेक व्हिडीओ गेले काही दिवस सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अनेक ठिकाणी 'छावा'चे शो हाऊसफुल सुरू आहेत. सगळ्या प्रेक्षकांना हा सिनेमा पाहता यावा, तरुण पिढीला महाराजांचा इतिहास कळावा यासाठी काही भागांमध्ये विशेष शोचं आयोजन देखील करण्यात आलं होतं.

'छावा'ने बॉक्स ऑफिसवर छप्पर फाडके कमाई केली आहे. सध्या 'छावा' सिनेमाची चर्चा पाहता दाक्षिणात्य सिनेप्रेमींनी हा चित्रपट विविध भाषांमध्ये प्रदर्शित केला जावा अशी मागणी केली होती. अखेर निर्मात्यांनी याबाबत अधिकृत पोस्ट शेअर करत 'छावा' सिनेमा लवकरच तेलुगू भाषेत प्रदर्शित करण्यात येईल असं जाहीर केलं आहे. भारताच्या धाडसी महापुरुषाची कथा 'छावा' चित्रपटाच्या माध्यमातून आता तेलुगू प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

येत्या ७ मार्चला हा सिनेमा तेलुगू भाषेत प्रदर्शित होणार आहे. गीता आर्ट्स डिस्ट्रिब्युशन्सच्या माध्यातून 'छावा' तेलुगू भाषेत प्रदर्शित केला जाईल. अशी पोस्ट 'मॅडॉक फिल्म्स'कडून शेअर करण्यात आली आहे.

दरम्यान, निर्मात्यांसह विकीने ही पोस्ट शेअर करत सिनेमा लवकरच तेलुगू भाषेत प्रदर्शित होईल असं जाहीर केलं आहे. तेलुगू भाषिक प्रेक्षकांनी त्यांचे आभार मानले आहेत. तर, आता लवकरात लवकर हा सिनेमा मराठी भाषेत सुद्धा प्रदर्शित करा अशी मागणी मराठी प्रेक्षकांकडून करण्यात येत आहे. मराठीमध्ये केव्हा होणार?, कन्नड आणि तामिळ भाषेत सुद्धा प्रदर्शित करा, मराठीत सिनेमा कधी येतोय याची वाट पाहतोय राजे अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी या पोस्टवर केल्या आहेत.

# प्रिती झिंटा राजकारणात येणार?



राजकारण आणि बॉलीवूड हे एक जुनं नातं असल्यासारख आहे. अनेक बॉलिवूड कलाकारांनी राजकारणात प्रवेश केला आहे. अभिनेत्री कंगना रणौत, रामायण मालिकेत रामाची भूमिका साकारनारे ज्येष्ठ अभिनेता अरुण गोविल, अभिनेत्री हेमा मालिनी, अभिनेता शत्रुघ्न सिन्हा आणि गोविंदा असे अनेक कलाकार राजकारणात सक्रीय झाले आहेत. आता बॉलिवूडची 'डिंपल गर्ल' प्रिती झिंटाला तिचे चाहते ती राजकारणात येणार का असे विचारताना दिसून येत आहेत. यावर खुद्द अभिनेत्रीनं खुलासा केलाय. प्रितीचा सोशल मीडियावरही तिचा दांडगा वावर आहे. रोखठोक मत मांडण्यासाठी ती ओळखली जाते. नुकतंच तिनं ट्विटरवर चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी एका चाहत्यांना तिला राजकारणात येण्याचा विचार करत आहे का? असा प्रश्न केला. यावर उत्तर देताना प्रीतीनं स्पष्टपणे कोणतीही राजकीय महत्त्वाकांक्षा नसल्याचं सांगितलं. ती म्हणाली, नाही! राजकारण माझ्यासाठी नाही. गेल्या काही वर्षांत, विविध पक्षांनी मला तिकिटे आणि राज्यसभेची जागा देऊ केली. परंतु मी नम्रपणे नकार दिला आहे. कारण मला ते नको आहे. याशिवाय एका चाहत्यानं तिला महाकुंभ २०२५ चे फोटो शेअर केल्यानंतर झालेल्या ट्रोलिंगबद्दल प्रश्न केला. यावर ती म्हणाली, जे लोक तुम्हाला खाली खेचण्याचा प्रयत्न करतात, ते आधीच तुमच्या खाली आहेत. मग त्यांची आणि ट्रोलची कोणाला पर्वा आहे. खरे धैर्य तेव्हा लागतं, जेव्हा तुम्ही स्वत:मध्ये आणि तुमच्या सभोवतालमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करता. जगाला इतरांसाठी एक चांगले ठिकाण बनवण्यासाठी काम करता.

# माधुरीचा २८ वर्षांपूर्वीचा 'तो' सिनेमा पुन्हा प्रदर्शित होणार!



नवदचं दशक गाजवणारी सुपरस्टार अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितला ओळखलं जातं. तिने आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. तिने केवळ अभिनयानेच नव्हे तर आपल्या नृत्यशैलीने सुद्धा चाहत्यांना भुरळ घातली आहे. आता 'धकधक गर्ल'चा २८ वर्षांपूर्वी सुपरहिट ठरलेला एक लोकप्रिय सिनेमा पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सध्या बॉलीवूडमध्ये जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची लाट आली आहे. काही दिवसांपूर्वीच २०१६ मध्ये प्रदर्शित झालेला 'सनम तेरी कसम' ९ वर्षांनी पुन्हा सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आणि त्या सिनेमाला प्रेक्षकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. याशिवाय 'कहो ना प्यार है', 'रहेना है तेरे दिल मै', 'तुझे मेरी कसम' असे अनेक सिनेमे गेल्या काही महिन्यांमध्ये पुन्हा प्रदर्शित करण्यात आले आणि या सगळ्याच सिनेमांना प्रेक्षकांचं प्रेम मिळालं. आता माधुरीचा २८ वर्षांपूर्वीचा एक सिनेमा पुन्हा भेटीला येणार आहे. माधुरीने या सिनेमात शाहरुख खान आणि करिश्मा कपूर यांच्यासह स्क्रिन शेअर केली होती. याशिवाय माधुरी आणि करिश्माचा एक डान्स फेस ऑफ सुद्धा प्रेक्षकांना यामध्ये पाहायला मिळाला होता. आता सर्वांच्या लक्षात आलं असेल पुन्हा प्रदर्शित होणाऱ्या सिनेमाचं नाव आहे 'दिल तो पागल हैं'. हा सिनेमा ३१ ऑक्टोबर १९९७ मध्ये प्रदर्शित झाला होता. त्याकाळी या चित्रपटाने 'सर्वोत्कृष्ट कोरिओग्राफर', 'सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्री' आणि 'लोकप्रिय चित्रपट' असे ३ राष्ट्रीय पुरस्कार आणि तब्बल ८ फिल्मफेअर अवॉर्ड जिंकले होते. आता पुन्हा हा चित्रपट प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. 'यशराज फिल्म्स'ने अधिकृत पोस्ट शेअर करत 'दिल तो पागल हैं' प्रेक्षकांच्या भेटीला पुन्हा एकदा येणार, अशी माहिती दिली आहे. यामध्ये माधुरी दीक्षित, शाहरुख खान, करिश्मा कपूर, अक्षय कुमार यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या. असंख्य नेटकऱ्यांनी या पोस्टवर कमेंट करत सिनेमा पाहण्यासाठी आतुर असल्याचं म्हटलं आहे.

# सई आणि समीर पहिल्यांदाच एकत्र

अभिनेत्री सई ताम्हणकर आणि समीर चौघुले यांची जोडी 'गुलकंद' या नव्या चित्रपटातून पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. सचिन गोस्वामी दिग्दर्शित आणि सचिन मोटे लिखित गुलकंद या चित्रपटात दोन भिन्न जोडप्यांच्या नात्यांचा प्रवास पाहायला मिळणार आहे. चित्रपटात सई ताम्हणकर आणि समीर चौघुले यांच्यासह प्रसाद ओक आणि ईशा डे या जोडीचा ही अप्रतिम अभिनय पाहायला मिळणार आहे. समीर म्हणाला, सई आणि माझी ओळख 'फू बाई फू' पासूनची आहे. आता 'गुलकंद'च्या निमित्ताने तिच्यासोबत काम करण्याचा योग आला. यासाठी खूप उत्सुक होतो. सईकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. तर सई म्हणाली की, हास्यजत्रेत समीरला समोर परफॉर्म करताना पाहणे आणि त्याच्यावर टिप्पणी करणे नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. कारण त्याला कोणत्याही मान्यतेची गरज नाही. तो एक अप्रतिम अभिनेता आहेच आणि माणूस म्हणूनही तो तितकाच उत्कृष्ट आहे. सहकलाकार म्हणूनही त्याच्याबरोबर काम करायला खूप मजा आली. मला त्याच्यासोबत पुन्हा काम करायला नक्कीच आवडेल.